| | |
|---|---|
| CNR No : MHAH-1900-0938-2024 | **नियमित दिवाणी दावा क्र.२६५/२०२४**<br>**देविदास ठाणगे वि. विनोद ठाणगे** |

## नि.क्र.३१ खालील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत स्वीकारणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादींचे असे कथन आहे की,– प्रतिवादी क्र.१ व ६ यांना वेळेत योग्य ते कागदपत्र व महत्वाची माहिती मिळाली नसल्याने प्रतिवादी मुदतीमध्ये कैफियत दाखल करु शकले नाहीत. सबब, सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत स्वीकरण्याबाबत विनंती केलेली आहे.

०३. वादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रतिवादींच्या अर्जास तिव्र विरोध दर्शवलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज खरा व बरोबर नसुन प्रतिवादीने अर्जात नमुद केलेले कारण सयुंक्तीक, व कायदेशीर नाही त्यामुळे अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदर प्रतिवादींनी कायदेशीर मुदतीत कैफियत दाखल केली नसल्याचे दिसुन येते तथापी त्यांच्ये विरुध्द विना कैफियत आदेश पारीत झाल्याचे दिसुन येत नाही.

५. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव, वाटप, कब्जा व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे त्यांना वेळेत योग्य कागदपत्र व महत्वाची माहिती मिळाली नसल्यामुळे मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करु शकले नाहीत. वादींनी प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत दाखल केलेला आहे. अशा परिस्थीतीत सदरचा दावा गुणदोषांवर निकाली निघणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रतिवादींचे म्हणणे अभिलेखावर असणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप, प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंब माफीचे कारण आणि नैसर्गीक न्याय–तत्वाचा विचार करता प्रतिवादीस कैफियत दाखल

करण्यास संधी देणे आवश्यक आहे. अशा परिस्थीत वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट पक्षकारांमधील वादाचे मुळ कारण निकाली निघण्यास फायदा होणार आहे. उपरोक्त परिस्थिती विचारात घेतली असता प्रतिवादी यांना झालेला उशिर त्यांच्यावर दंड आकारुन माफ करता येऊ शकतो. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निकाली निघण्यासाठी मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.३००/– चे दंडासहित मंजुर करण्यात येतो. प्रतिवादींनी सदर दंडाची रक्कम पुढील तारीख अथवा त्यापुर्वी वादींना द्यावी.

२. सदर प्रतिवादींनी दंडाची रक्कम वादींना दिल्यानंतर सदर प्रतिवादींची कैफियत स्वीकरण्यात येईल.

KULKARNI DATTATRAYA RAMESH

Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2025.10.27 17:20:21 +0530

दिनांक : २७.१०.२०२५

(डी.आर.कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
शेवगाव